N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई  **P.S.(ठाणे):** तुर्भे एमआयडीसी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0319  **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/09/2023 05:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 11/09/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/09/2023
**Time From (वेळेपासून):** 18:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/09/2023  **Time (वेळ):** 04:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/09/2023 05:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 8 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महापे वाहतुक पोलीस चौकी ,महापे नवी मुंबई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सागर तात्यासो गायकवाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सुभाषनगर, शिवकपा चाळ,दिघा एमआयडीसी रोड नवी मुंबई,तुर्भे एमआयडीसी,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुभाषनगर, शिवकपा चाळ,दिघा एमआयडीसी रोड नवी मुंबई,तुर्भे एमआयडीसी,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रविण भोजु राठोड | | | 1. 605, अनंत पार्क, सेक्टर नं 16E,रोडपाली, ,कळंबोली, ,जि रायगड,तुर्भे एमआयडीसी,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | नामदेव दत्ताराम गादेकर | | | 1. 306, अ विंग, सेक्टर नं 08,, शांतीनिकेतन अपार्टमेंन्ट, खारघर, जिरायगड,तुर्भे एमआयडीसी,नवी मुंबई,महाराष्ट्र, |



Scanned with CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

दिनांक 12/09/2023

मी सागर तात्यासो गायकवाड वय 35 वर्षे, धंदा:- रिक्षा चालक, रा. सुभाषनगर, शिवकृपा चाळ, दिघा एमआयडीसी रोड नवी मुंबई, समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई कार्यालयात हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, (मो. 9321399463)

मी वरील नमुद प्रमाणे असून वरील ठिकाणी गेले 10 वर्षोपासुन माझे कुटुंबासह राहत आहे. मी माझे स्वतःचे मालकीची ऑटोरिक्षा क्र. एमएम43/बीएफ 4818 ऐरोली ते दिघा परीसरात प्रवाशी वाहतुक करून चालवितो व त्याव्दारे मिळणा-या उत्पन्नावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

आज दिनांक 11/09/2023 रोजी दुपारी 01.00 वाजताचे सुमारास मी माझे मालकीची ऑटोरिक्षा क्र. एमएम43/बीएफ 4818 मधुन दिघा बाजुकडुन महापेकडे एमआयडीसी रोडने जात असतांना महापे सर्कलचे जवळ आल्यानंतर मोटार सायकलवरून आलेल्या वाहतुक शाखेच्या दोन पोलीसांनी माझी रिक्षा अडविली. त्यानंतर मोटार सायकलच्या पाठीमागे बसलेले अंमलदार हे माझे रिक्षात बसले व मोटार सायकल चालविणारे पोलीस अंमलदार हे महापे चौकीच्या दिशेने निघाले. माझे ऑटोरिक्षामध्ये बसलेल्या पोलीस अंमलदार यांनी माझेकडे रिक्षाचे पेपर तसेच माझे ड्रायव्हींग लायसन्सची मागणी केली. त्यावेळी मी युनिफार्मवर नव्हतो तसेच मी त्यांना 'माझे रिक्षाचे कागदपत्र व ड्रायव्हिंग लायसन्स घरी विसरलो,' असल्याचे सांगीतले. त्यावेळी पोलीस अंमलदार यांनी मला दंड भरावे लागेल असे सांगीतले असता मी त्यांना नेमकी किती रक्कम भरावी लागेल? असे विचारले असता त्यांनी मला माझा आजरोजीचा मोबाईल टॉकींग, फिटनेस, इन्शुरन्स, ड्रायव्हींग लायसन्स, युनिफॉर्म तसेच ऑटोरिक्षाचे कागदपत्रे सोबत न बाळगल्याबाबत असा एकुण दंड रू. 10,000/- ते 11,000/- भरावा लागेल असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना 'माझेकडे रिक्षाचे सर्व पेपर असून माझे ड्रायव्हिंग लायसन्स सुध्दा आहे परंतु ते घरी विसरलो असुन घरून घेवून येतो' असे सांगीतले. परंतु त्यांनी माझे काहीएक न ऐकता मला 'रू. 10,000/- रक्कम भरण्यास सांगुन रक्कम भरणार नसशील तर रिक्षा जमा होईल' असे सांगुन मला महापे वाहतुक चैकीला रिक्षा घेण्यास सांगीतले. त्यानुसार मी माझी रिक्षा महापे वाहतुक चौकीला घेतली. मी महापे चौकी येथे आलो असता मोटार सायकल चालविणा-या व माझे रिक्षामध्ये पाठीमागे बसलेल्या पोलीस अंमलदार या दोघांनी मला रिक्षा वाहतुक चौकीच्या पाठीमागे असलेल्या मोकळया जागेत उभी करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझी ऑटोरिक्षा वाहतुक चौकीच्या पाठीमागे असलेल्या मोकळया जागेत उभी केली. त्यानंतर मी पुन्हा दोन्ही पोलीस अंमलदार यांच्याजवळ येवून त्यांना 'नेमकी किती रक्कम भरावी लागेल?' असे विचारले असता माझे रिक्षात बसलेले अंमलदार यांनी मला आजच्या दंड रक्कमेच्या अर्धी रक्कम म्हणजे 'रू. 5,000/- दे तुझी रिक्षा सोडुन देतो, परंतु त्याबदल्यात पावती



Scanned with CamScanner

मिळणार नाही,' असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना एवढी रक्कम कोठुन आणू असे म्हणालो असता त्यांनी माझे काहीएक न ऐकता मला 'पैसे आणले तरच रिक्षा सोडुवून घेवून जा' असे सांगीतले व माझे रिक्षाची चावी स्वतःकडे ठेवून घेतली.

महापे वाहतुक शाखेचे पोलीस अंमलदार हे माझेकडे मागणी करीत असलेली रक्कम रू. 5,000/- हि लाच असल्याने सदर लाचेची रक्कम त्यांना देण्याची माझी अजिबात इच्छा नसल्याने महापे वाहतुक शाखेचे पोलीस अंमलदार हे मागणी करीत असलेल्या लाचेप्रकरणी त्यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई होणेकरीता मी, दि. 11/09/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई कार्यालयात हजर राहुन स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार पोलीस उपअधिक्षक श्री. शिवराज म्हेत्रे यांचेकडे दिली असता त्यांनी पोनि श्रीमती अरूंधती येळवे यांना माझे तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणीची सत्यता पडताळणी करण्याकरीता पोनि श्रीमती अरुंधती येळवे यांनी वाँर्ड अधिकारी, घणसोली, नवी मुंबई कार्यालयास लेखी पत्र देवून दोन शासकिय पंच साक्षीदार मागविले. पंच साक्षीदार अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर पोनि श्रीमती अरुंधती येळवे ए.सी.बी. नवी मुंबई यांनी पंचांना माझी ओळख करून दिली. सदरवेळी मी, पंच साक्षीदार यांना माझे तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगितली व माझी लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली असता पंचानी वाचुन माझे तक्रारीवर सही केली. त्याचवेळी पोनि श्रीमती अरुंधती येळवे यांनी मला सदर पडताळणी पथकातील पोलीस अंमलदारांची ओळख करून दिली.

मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुशषंगाने लोकसेवक यांचे लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी करीता मी डिजीटल व्हॉईस रेकार्डरसह पंच साक्षीदार यांचे समवेत दिनांक 11/09/2023 रोजी 16:51 वा ते 17:10 वाजेदरम्यान माझी ऑटो रिक्षा महापे वाहतुक शाखा येथे जमा करणारे वाहतुक शाखचे पोलीस अंमलदार यांना भेटण्यास गेलो. सदर ठिकाणी लोकसेवक दिसून न आल्याने मी तेथिल वाहतूक चौकीतील इतर अंमलदार यांना त्यांचे बाबत चौकशी केली असता त्यांनी गादेकर यांचे नाव घेवून त्यांना फोन करतो असे बोलले. फोन केल्यानंतर ते चौकीत येत असल्याबाबत मला सांगितले. काही वेळाने सदर ठिकाणी लोकसेवक गादेकर येण्यापुर्वी लोकसेवक राठोड आले त्यावेळी ते मला '' आ... फाईन भराव लागेल ना......फिटनेसची फाईन भरतो का फक्त... तुम्ही निघून गेलात तर आम्ही काय करणार.....दोनशे रुपये फाईन आहे का त्याला? त्याला गाडीचा फिटनेस संपलाय.... इन्शुरन्स नाही...मोबाईल टॉकींग आहे..... एक फाईनचुकी आहे का?.....'' असे मला बोलले त्यावेळी मी त्यांना कामासाठी आलेलो रिक्षा चालवित नव्हतो असे सांगितले. त्यावर त्यांनी मला मोबाईलवर बोलतांना सापडला असल्याचे सांगुन '' किती भरणार आहे '' याबाबत मला सांगुन '' फिटनेसच भर फक्त.....बाकिच सोडतो....बाकी तुझं लायसन्स बी सस्पेंड होतेय.....डाकुमेंट ते बी करत नाय.... ते साहेबाशी बोलून घे.....'' असे मला बोलले. त्यावेळी सदर ठिकाणी लोकसेवक गादेकर आले त्यांनी मला '' भरा ना पैसे भरा ना.... '' असे बोलले असता मी त्यांना '' रिसीट मिळेल का '' याबाबत विचारले असता त्यांनी मला रिसीट मिळणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर काहीवेळ चर्चा करून लोकसेवक गादेकर यांनी मला '' हा बोल किती देणार?.... आ...किती....'' असे विचारले असता मी त्यांना '' दोन हजारापर्यंत घेवून येतो.....'' असे बोलला असता लोकसेवक गादेकर यांनी मला '' जा घेवून ये '' असे बोलून रूपये दोन हजार रूपयांची मागणी केल्यानंतर मी पंच क्रं. 1 यांचे सोबत पडताळणी पथक थाबले ठिकाणी आलो.

अशा प्रकारे माझे ऑटो रिक्षावर वाहतुक नियमांचे उल्लंघनाबाबतची कारवाई न करण्याकरीता व ऑटोरिक्षा सोडुन देण्यासाठी लोकसेवक वाहतूक पोलीस अंमलदार गादेकर हे तडजोडी अंती रू. 2,000/- रक्कमेच्या लाचेची मागणी करीत असल्याबाबत स्पष्ट झाल्याने त्यांचेविरूध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे पोनि श्रीमती अरुंधती येळवे यांनी ठरविले.

त्यानंतर पोनि श्रीमती अरुंधती येळवे यांनी पंचासमक्ष मला एसीबी, नवी मुंबई कार्यालयात सापळापुर्व कार्यवाहीची माहीती दिली. त्यावेळी मी पोनि श्रीमती अरुंधती येळवे यांच्या सुचनेप्रमाणे माझेकडे उपलब्ध असलेली रक्कम रू. 2,000/-(त्यामध्ये रू.500/- दराच्या 4 भारतीय चलनी नोटा) ही सापळा कारवाईसाठी पोनि श्रीमती अरुंधती येळवे यांच्या समक्ष हजर केली. सापळापुर्व कार्यवाही दरम्यान मपोना/बासरे यांनी सदर रक्कमेस अँथ्रासिन पावडर



Scanned with CamScanner

लावून सदरच्या नोटा माझे पॅन्टच्या उजवे खिशात ठेवल्या. त्यानंतर पोनि श्रीमती अरुंधती येळवे यांनी सापळापुर्व कार्यवाही पुर्ण करून सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान पंच साक्षीदार यांचे समवेत डिजीटल व्हॉईस रेकार्डरसह 18:50 वाजता ते 18:58 वाजे दरम्यान पायी चालत महापे वाहतूक पोलीस चैकीच्या ठिकाणी गेलो असता चौकी बाहेर मला लोकसेवक गादेकर भेटले त्यावेळी त्यांनी मला माझे सोबत असणारे पंच साक्षीदार यांच्याबाबत विचारणा केली असता मी भाऊ असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी लोकसेवक गादेकर यांनी माझ्या ऑटो रिक्षाची चावी मला देवून त्यांच्या मोटार सायकलवर मागे बसण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना कोठे जायचे आहे विचारले असता त्यांनी मला मोटार सायकलवर बसण्यास सांगुन जावून येवूयात असे मला बोलले. त्यानंतर मी त्यांच्या मोटार सायकलवर मागे बसलो व महापे गावच्या दिशेने मोटार सायकलवर निघालो असता समोरून लोकसेवक राठोड येतांना दिसले. त्यावेळी लोकसेवक गादेकर यांनी यु टर्न घेवून पुन्हा चौकीजवळ आलो असता मी त्यांना '' तुमच्याकडे देवू ? '' असे त्यांना विचारले त्यावर लोकसेवक गादेकर यांनी लोकसेवक राठोड यांच्याकडे मला जाण्याचा इशारा केला त्यानुसार मी लोकसेवक राठोड यांचेकडे चौकीचे आतमध्ये दरवाजाजवळ जावून त्यांना '' दोन हजार रुपये आहेत......दोन हजारावर झाली मांडवली, आणि ही चावी भेटली.....'' असे बोलून पैसे दिले असता लोकसेवक राठोड यांनी लाचेची रक्कम स्विकारली. त्यावेळी मी त्यांना '' याची काय बारकी, रिसीट वगैरे पावती काय? '' असे विचारले असता त्यांनी '' फिटनसेच्या दोन हजाराची पावती भेटते का?...'' असे बोलले. त्यानंतर मी सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा" केल्यानंतर सापळा पथकाने पोना/3248 प्रविण भोजु राठोड वय 33 वर्षे यांना लाचेच्या रक्कमेसह 18:58 वा. महापे पोलीस चौकी येथे ताब्यात घेतले. त्याचवेळी सदरठिकाणी असलेले पोशि/12482 नामदेव दत्ताराम गादेकर वय 35 वर्षे, यांनाही सापळा पथकाने ताब्यात घेतले.

त्यानंतर आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालय, येथे सापळा पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आली.

तरी दिनांक 11/09/2023 रोजी माझे ऑटोरिक्षावर वाहतुक नियमांचे उल्लंघनाबाबतची कारवाई न करता ऑटोरिक्षा सोडुन देण्यासाठी 1) पोना/3248 प्रविण भोजु राठोड वय 33 वर्षे 2) पोशि/12482 नामदेव दत्ताराम गादेकर वय 35 वर्षे, दोन्ही नेमणूक महापे वाहतुक शाखा, नवी मुंबई यांनी माझेकडे रू.5,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून, दिनांक 11/09/2023 रोजी 16:51 वा ते 17:10 वाजण्याच्या सुमारास लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक पोशि/ नामदेव गादेकर यांनी तडजोडीअंती रू. 2,000/- लाचेची मागणी करून, सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक पोशि नामदेव गादेकर यांनी सांगितल्यानुसार मी लाचेची रक्कम लोकसेवक श्री. प्रविण राठोड यांना देण्यास गेलो असता लोकसेवक श्री. प्रविण राठोड यांनी वाहतुक चौकीमध्ये रू. 2,000/- लाचेची रक्कम स्विकारली. त्यावेळी लोकसेवक श्री. प्रविण राठोड यांना महापे वाहतुक शाखेतील पोलीस चौकीमध्ये लाचेच्या रक्कमेसह 18:58 वा. सापळा पथकाने रंगेहाथ ताब्यात घेतले तसेच लोकसेवक श्री. नामदेव गादेकर यांना हि त्याचवेळी सापळा पथकाने ताब्यात घेतले आहे म्हणून माझी 1) पोना/3248, प्रविण भोजु राठोड, वय 33 वर्षेमहापे वाहतुक शाखा, नवी मुंबई रा. रूम नं. 605, अनंत पार्क, सेक्टर नं. 16/ई, रोडपाली, कळंबोली, जि. रायगड 2) पोशि/12482 नामदेव दत्ताराम गादेकर, महापे वाहतुक शाखा, नवी मुंबई रा. शांतीनिकेतन अपार्टमेन्ट, रूम नं. 306, अ विंग, सेक्टर नं. 08, खारघर, जि.रायगड यांच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मी वाचुन पाहीला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

हे लिहून दिले     सही

( अरुंधती येळवे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
dattatray shivram daphal
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): pbmh89337
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA RANGNA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPRRDM7104



Scanned with CamScanner